नागपूर महानगरपालिकेच्या दि.01.06.2017 गुरूवार रोजी सकाळी 11.30 वाजता राजे रघोजीराव भोसले नगर भवन, महाल येथे भरलेल्या स्थगित सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्त

## उपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **20** | **ड** | **दिपराज भैय्याजी पार्डीकर** | **कार्यकारी महापौर** |
| 2. | 1 | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| 3. | 1 | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| 4. | 1 | क | प्रमिला प्रितम मंथरानी | सदस्या |
| 5. | 1 | ड | विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| 6. | 2 | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 7. | 2 | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| 8. | 2 | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 9. | 3 | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| 10. | 3 | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 11. | 3 | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| 12. | 4 | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| 13. | 4 | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 14. | 4 | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 15. | 4 | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| 16. | 5 | अ | दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 17. | 5 | ब | प्रविण विलासराव भिसीकर | सदस्य |
| 18. | 5 | क | अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 19. | 5 | ड | संजय अरूणराव चावरे | सदस्य |
| 20. | 6 | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| 21. | 6 | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| 22. | 6 | ड | मो. इब्राहिम तौफीक अहमद | सदस्य |
| 23. | 7 | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| 24. | 7 | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| 25. | 7 | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| 26. | 7 | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 27. | 8 | अ | आशा नेहरू उईके (आयेशा) | सदस्या |
| 28. | 8 | ब | अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 29. | 8 | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 30. | 9 | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| 31. | 9 | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| 32. | 9 | ड | नरेन्द्र नत्थुजी वालदे | सदस्य |
| 33. | 10 | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 34. | 10 | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| 35. | 11 | अ | संदिप चंद्रभान जाधव | सदस्य |
| 36. | 11 | ब | संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 37. | 11 | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 38. | 11 | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| 39. | 12 | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| 40. | 12 | ड | जगदीश शिवदास ग्वालबंशी | सदस्य |
| 41. | 13 | अ | अमर हरीष बागडे | सदस्य |
| 42. | 13 | ब | रूतिका योगेश मसराम | सदस्या |
| 43. | 13 | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| 44. | 14 | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| 45. | 14 | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| 46. | 14 | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| 47. | 15 | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 48. | 15 | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| 49. | 15 | क | रूपा शेखर राय | सदस्या |
| 50. | 15 | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| 51. | 16 | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| 52. | 16 | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| 53. | 16 | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| 54. | 16 | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| 55. | 17 | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| 56. | 17 | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 57. | 17 | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 58. | 17 | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| 59. | 18 | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| 60. | 18 | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| 61. | 18 | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 62. | 18 | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| 63. | 19 | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 64. | 19 | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| 65. | 19 | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| 66. | 19 | ड | दयाशंकर चंद्रशेखर तिवारी | सदस्य |
| 67. | 20 | अ | शकुंतला वामन पारवे | सदस्या |
| 68. | 20 | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| 69. | 20 | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| 70. | 21 | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| 71. | 21 | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| 72. | 21 | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 73. | 21 | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 74. | 22 | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| 75. | 22 | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| 76. | 22 | क | श्रद्धा विजय पाठक | सदस्या |
| 77. | 22 | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| 78. | 23 | अ | कांता राधेश्याम लारोकर | सदस्या |
| 79. | 23 | ब | मनिषा आशिष धावडे | सदस्या |
| 80. | 23 | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| 81. | 24 | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| 82. | 24 | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 83. | 24 | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| 84. | 24 | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| 85. | 25 | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्या |
| 86. | 25 | ब | पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 87. | 25 | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| 88. | 25 | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| 89. | 26 | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| 90. | 26 | ब | समीता राजेश चकोले | सदस्या |
| 91. | 26 | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 92. | 26 | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्य |
| 93. | 27 | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| 94. | 27 | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| 95. | 27 | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| 96. | 27 | ड | हरिष सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| 97. | 28 | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| 98. | 28 | क | रेखा राजु साकोरे | सदस्या |
| 99. | 28 | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| 100 | 29 | अ | लीला अजय हाथीबेड | सदस्या |
| 101 | 29 | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| 102 | 29 | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| 103 | 29 | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| 104 | 30 | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| 105 | 30 | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| 106 | 30 | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| 107 | 31 | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| 108 | 32 | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| 109 | 32 | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 110 | 32 | क | रूपाली प्रशांतसिंह ठाकुर | सदस्या |
| 111 | 32 | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 112 | 33 | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |
| 113 | 33 | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| 114 | 33 | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| 115 | 34 | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 116 | 34 | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| 117 | 34 | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| 118 | 34 | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 119 | 35 | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 120 | 35 | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| 121 | 35 | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| 122 | 36 | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| 123 | 36 | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| 124 | 36 | क | लहु दत्तुजी बेहते | सदस्य |
| 125 | 36 | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| 126 | 37 | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| 127 | 37 | ब | सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 128 | 37 | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| 129 | 38 | अ | उज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| 130 | 38 | ब | प्रफुल्ल विनोदराव गुडधे | सदस्य |
| 131 | 38 | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |

## अनुपस्थित सदस्य

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|---|---|
| 1. | **37** | **क** | **नंदा शरद जिचकार** | **महापौर** |
| 2. | 2 | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| 3. | 3 | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 4. | 6 | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 5. | 8 | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| 6. | 9 | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| 7. | 10 | क | नितिश गंगाप्रसाद ग्वालबंशी | सदस्य |
| 8. | 10 | ड | गार्गि प्रशांत चोपरा | सदस्या |
| 9. | 12 | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| 10. | 12 | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 11. | 13 | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| 12. | 14 | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 13. | 23 | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| 14. | 28 | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| 15. | 30 | अ | नागेश गोविदराव सहारे | सदस्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 16. | 31 | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 17. | 31 | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 18. | 31 | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| 19. | 33 | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| **20.** | **35** | **अ** | **निलेश ज्ञानेश्वर कुंभारे** | **रिक्त पद** |

**उपस्थित अधिकारी**

श्री.अश्विन मुदगल, निगम आयुक्त

श्री.हरिश दुबे, निगम सचिव

मा. महापौरजी यांनी सभेची कार्यवाही सुरु केली.

**ठराव क्रमांक 31** :– मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले व सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

**म.न.पा. 12 वी परीक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता 12 वीच्या परीक्षेत नागपूर महानगरपालिकेच्या एम.के. आझाद उर्दू कला शाखेतील आरिया बानो अहमद करीम कुरेशी हिने 78.61 टक्के, साजिया कौसर मकबुल अहमद हिने 76.03 टक्के, साने गुरूजी उर्दू शाळेतील निखत परवीन जीब्राईल खान हिने 75.07 टक्के पटकावून नेत्रदिपक यश प्राप्त केले. वाणिज्य शाखेत एम.ए.के आझाद उर्दू शाळेतील सिमरन शेख शकील हिने 79.08 टक्के, शोयब अब्दुल रहीम याने 66.61 टक्के, ताजबाद उर्दू शाळेतील रमजान मो. रफिक याने 66.42 टक्के गुण पटकावले तर विज्ञान शाखेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेतील ऋतिका झोडापे हिने 71.38 टक्के, रूचिरा अडकिने हिने 70.76 टक्के तर एम.ए.के. आझाद उर्दू शाळेतील शाईस्ता बानो हिने 69.38 टक्के गुण प्राप्त केले.

म.न.पा.च्या एकुण 28 शाळा असून 4 ज्युनिअर कॉलेज आहेत. यावर्षी 302 विद्यार्थी परीक्षेला बसले त्यापैकी 267 विद्यार्थी उत्तीर्ण झाले. म.न.पा. शाळांचा निकाल 88.41 टक्के लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च माध्यमिक शाळेने चांगली गुणवत्ता घेऊन नेत्रदिपक यश संपादन केल्याबद्दल त्या शाळेच्या

मुख्याध्यापिका रजनी देशकर, एम.ए.के आझाद उर्दू उच्च माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका निखत खान, साने गुरूजी उर्दू उ.मा.शाळेचे मुख्याध्यापक वामन मून, ताजबाद उर्दू उ.मा.शा. चे मुख्याध्यापक अजीज खान व इतर शिक्षकांचे देखील म.न.पा.ची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## <u>12 वी परिक्षेत उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन</u>

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घोषित करण्यात आलेल्या बारीवी परीक्षेच्या निकालात दरवर्षीप्रमाणे यंदा देखील मुलांच्या तुलनेत मुलीनींच बाजी मारली आहे. राज्याप्रमाणेत नागपूर विभागात देखील विज्ञान, वाणिज्य, कला या तिन्ही शाखांतील गुणवंतामध्ये मुलींचाच जास्त भरणा आहे. 'सबसे सफल, बेटी हमारी' या शब्दात गुणवंताचे कौतुक होत आहे. विज्ञान शाखेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचा विद्यार्थी आनंद जवादे याने 98.15 टक्के (638) गुणांसह पहिला क्रमांक पटकाविला. वाणिज्य शाखेत कमला नेहरू महाविद्यालयाची अंजली शहा हिने 96.76 टक्के (629) गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. कला शाखेत देखील मुलींचे वर्चस्व असून 'एलएडी' महाविद्यालयाची जुई सगदेव हिने 94. 76 टक्के (616) गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला आहे. नागपूर जिल्हातून दिव्यांगांमधून एलएडी महाविद्यालयातील कला शाखेची विद्यार्थिंनी दिविजा सुतोणे ही 88.60 टक्के गुण मिळवुन प्रथम आली. तर 'एमसीव्हीसी' तून कमला नेहरू महाविद्यालयाच्या अश्विनी पराळे हिने 79.07 टक्के गुणासह प्रथम क्रमांक पटकविल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## <u>मा.गो. वैद्य</u>

महाराष्ट्रतील पत्रकारांची पहिली संघटना म्हणून परिचित असलेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'जीवन गौरव' पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत आणि तरूण भारताचे माजी संपादक मा.गो. उर्फ बाबुराव वैद्य यांना जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**डॉ. विलास डांगरे**

नागपूर शहरातील प्रसिद्ध होमिओपॅथ डॉ. विलास डांगरे यांची पुण्यातील डॉक्टर्स डिरेक्टरी ऑफ इंडीया (डीडीआय) हेल्थकेअर पुरस्कर समितीने 2017 सालच्या जीवनगौरव पुरस्कारासाठी निवड केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**अविनाष पांडे**

काँग्रेसच्या केंद्रीय कार्यकारिणीत माजी राज्यसभा सदस्य अविनाश पांडे यांची राष्ट्रीय महासचिवपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**प्रवीण दटके**

प्रभाग क्र.18 (अ) चे नगरसेवक तसेच नगरीचे माजी महापौर प्रवीण दटके यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**मायाताई इवनाते**

प्रभाग क्र. 12(ब) च्या नगरसेविका व नगरीच्या माजी महापौर श्रीमती मायाताई इवनाते यांची केंद्रीय अनुसूचित जनजाती आयोगाच्या सदस्यपदी निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**ॲड. सुलेखा कुंभारे**

राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग (एनसीएम) च्या सदस्यपदी माजी मंत्री ॲड. सुलेखा कुंभारे यांची केंद्र सरकराच्या वतीने नियुक्ती करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**विष्णू मनोहर**

अखंड 53 तास उभे राहून एक हजाराहून  अधिक चविष्ट शाकाहारी पदार्थ तयार करीत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नांव नोंदविणारे नागपूरचे 'विक्रमादित्य' सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांनी जागतिक विक्रम करून नागपूर नगरीचे नांव गौरवान्वीत केल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ. चंद्रशेखर मेश्राम</u>**

सुप्रसिध्द न्युरोलॉजिस्ट डॉ.चंद्रशेखर मेश्राम यांची जागतिक ट्रापिकल न्यूरोलॉजी या संस्थेच्या अध्यक्षपदी निवड झाली. या पदावर कुण्या भारतीय डॉक्टराची पहिल्यांदाच निवड झाली असून त्यांनी नागपूर नगरीचे नांव गौरवान्वित केल्याबद्‌दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ. अलका सरमा</u>**

आसाममध्ये महिला सबलीकरण आणि आदिवासींच्या शिक्षणासाठी काम करणाऱ्या सुविख्यात सामाजिक कार्यकर्त्या, अर्थशास्त्रज्ञ डॉ. अलका सरमा यांना यावर्षीच्या डॉ. गिरीश गांधी राष्ट्रीय सामाजिक कार्य पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>मोना मेश्राम</u>**

इंग्लड येथे 24 जून ते 23 जुलै दरम्यान होणाऱ्या आयसीसी वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय महिला संघात मोना मेश्रामची निवड करण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>राजेष टिकले</u>**

श्रीपोद्दारेश्वर राममंदीर आणि श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा समितीच्या संयुक्त विद्यमाने विशेष आकर्षक छायांकनासाठी दैनिक लोकमतचे वृत्तछायाचित्रकार राजेश टिकले यांना प्रथम पुरस्काराने

गौरविण्यात आल्याबद्दल नागपूर महानगरपालिकेची ही सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

## <u>ई–पोर्टल नागपूर टुडे</u>

देशातील विख्यात फिड पोस्ट नामक एजंसीने भारतातील 40 सर्वश्रेष्ठ न्यूज वेबसाईटची निवड केली त्यामध्ये नागपूर जिल्हयातील 24 बाय 7 ई–पोर्टल 'नागपूर टुडे' ला 27 वा क्रमांक प्राप्त झाला.

नागपूर टुडे या ई–पोर्टलवर प्रारंभापासूनच विशेष कॉलम द्वारे नागपूर महानगरपालिकेशी संबंधित वृत्ते दररोज संकलित केल्या जातात. त्यासाठी त्यांचे प्रतिनिधी राजीव कुशवाहा यांचेसह नागपूर टुडे परिवाराचे म.न.पा. ची ही सभा विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौरः– मा.सदस्य गण, विभागीय आयुक्त यांच्या 19.5.17 च्या पत्रान्वये श्री.तानाजी सुकलाजी वनवे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे गटनेते यांना महापौरजी यांनी दिनांक 20.5.17 रोजी महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम 19–एम अ, अ अन्वये विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता प्रदान केली. श्री. तानाजी सुकलाजी वनवे हे 20.5.17 पासून नागपूर महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते आहेत.

**<u>ठराव क्रमांक 32</u>ः–** महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 कलम 3 व 4 अन्वये नगरपालिका शासनाचे विशेष ज्ञान व अनुभव असणारे व्यक्तीचे महानगरपालिकेत नामनिर्देशन करण्याचा प्रश्न सभागृहाने विचारात घेतला

आयुक्त महानगरपालिका यांनी बंद लखोटा मा.महापौरजी यांना सभेत सादर केला. कार्यकारी महापौर यांनी बंद लखोटा सभेत सर्वासमक्ष उघडले आणि निगम सचिव यांना आयुक्त महानगरपालिका यांची सदर शिफारस सदनासमक्ष वाचन करण्याचे निर्देश दिले.

निगम सचिवः– मा.महापौरजी, नागपूर महानगरपालिके करीता 5 सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत मा.आयुक्तांच्या शिफारसीचे वाचन मी करीत आहो.

महाराष्ट्र महानगरपलिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 कलम 3 अन्वये 5 व्यक्तीचे नामनिर्देशन सदस्य म्हणून महानगरपालिकेला नियुक्ती करावयाची आहे. (प्रत संलग्न 'I' वर) नामनिर्देशित सदस्यांची अर्हता नियम 4 अन्वये खालील प्रमाणे असेल. (संलग्न पताका 'I1')

**नामनिर्देशनासाठी अर्हता :–** एखाद्या व्यक्तीकडे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान अथवा अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशित पालिका सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास पात्र असेल, जर ती व्यक्ती

(क) राज्यात मान्यताप्राप्त व नोंदणाकृत वैद्यक व्यवसायी म्हणून किमान पाच वर्ष काम केलेली असेल, किंवा

(ख) किमान पाच वर्ष शिक्षण तज्ञ म्हणून काम केलेली असेल, यामध्ये मान्यता प्राप्त शाळा किंवा महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल, किंवा

(ग) सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी 5 वर्षाचा अनुभव धारण केलेली असेल, किंवा

(घ) कमीत कमी पाच वर्षाचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवीधारक असेल, किंवा

(ड) राज्यात कमीत कमी पाच वर्षाकरीता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवीधारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षाचा अनुभव असलेली असेल, किंवा

(च) नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहा. आयुक्त किंवा उपायुक्त म्हणून काम करण्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेली किंवा किमान दोन वर्षाचा अनुभव असलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल, किंवा

(छ) महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान पाच वर्षाचा अनुभव असलेली असेल.

उक्त शासन निर्णयातील नियम 5(1) अन्वये आयुक्त, पालिका सदस्यांचे नाम निर्देशन करण्यासाठी महानगरपालिकेतील सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि प्रत्येक मान्यता प्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षांच्या किंवा गटांच्या नेत्याशी विचार विनिमय करून आणि अशा पक्षांचे आणि गटांचे तौलनिक संख्या बळ विचारात घेवून महानगरपालिकेला योग्य व्यक्तीच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणून नाम निर्देशन करण्यासाठी शिफारस करतील.

मा. विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या कडून प्राप्त झालेल्या पक्ष/गट निहाय संख्या बळानुसार तौलनिक संख्याबळ व पक्ष/गट निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्याचे निर्धारण खालील प्रमाणे होत आहे.

| अनु.क्र. | मा. विभागीय आयुक्त यांच्याकडे नोंद झालेले पक्ष/गट | सदस्य संख्या | तौलनिक संख्याबळ | नियुक्त करावयाची सदस्य संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्णांक संख्या | अपूर्णांक संख्या | एकूण |
| 1 | भारतीय जनता पक्ष | 108 | 3.57 | 3 | 1 | 4 |
| 2 | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष | 29 | 0.96 | — | 1 | 1 |
| 3 | बहुजन समाज पक्ष | 10 | 0.33 | 0 | 0 | 0 |

उक्त नियमातील नियम 5 अन्वये आयुक्त, महानगरपालिका यांना सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व गट नेत्यांशी विचारविनिमय करून व अशा पक्षाचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवून महानगरपलिकेत योग्य व्यक्तीच्या नावाची नामनिर्देशीत सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याची शिफारस करतील या तरतूदी अन्वये महानगरपालिकेतील सभागृह नेता व गटनेता भारतीय जनता पक्ष, विपक्षनेते व गटनेते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष यांच्या समवेत दिनांक 04.05.2017 रोजी बैठकीचे आयोजन मा. आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले अति आयुक्त (1) यांनी घेतली आणि या नियमातील तरतूद नामनिर्देशनाची अर्हता व भारतीय जनता पक्षाला त्यांच्या तौलनिक संख्याबळानुसार 4 सदस्यांचे व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाला त्यांच्या तौलनिक संख्याबळानुसार 1 सदस्याचे नामनिर्देशन करण्याकरीता पत्र क्र. 335/दिनांक 05.05.2017 अन्वये

कळविण्यात आले. सदर पत्रात नामनिर्देशन पत्र गुरूवार दिनांक 18.05.2017 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजे पर्यंत उमेदवाराने आयुक्त, महानगरपालिका नागपूर यास व्यक्तीशः सादर करण्याची व प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी दिनांक 19.05.2017 रोजी सकाळी 11.00 वाजे पासून करण्याचे सुचित करण्यात आले. (संलग्न पताका 'ठ' वर)

गुरूवार दिनांक 18.05.2017 रोजी नामनिर्देशन पत्र सादर करण्याकरीता निर्धारीत केलेल्या वेळेत सकाळी 11.00 ते 3.00 दरम्यान मला भारतीय जनता पक्षातर्फे त्यांना त्यांच्या तौलनिक संख्याबळानुसार करावयाच्या 4 सदस्यांचे नामनिर्देशीत पत्र खालील प्रमाणे प्राप्त झाली.

| अनु क्र. | नाव | अर्हता |
|---|---|---|
| 1 | श्री. अग्रवाल सुनील जीवराज | 1) माजी नगरसेवक व माजी उपमहापौर असल्याने पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव असलेले व्यक्ती<br>2) नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. महाराष्ट्र पावर लिफ्टींग असोशिएसन, नागपूर चे अध्यक्ष वर्ष 2008 पासून चे अध्यक्ष |
| 2 | श्री. पोकुलवार गणेश (मुन्ना) रामन्ना | माजी नगरसेवक व माजी उपमहापौर असल्याने पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव असलेले व्यक्ती |
| 3 | श्री. वानखेडे किशोर रामकृष्ण | नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. इन्स्टीटयुट ऑफ इंजीनिअरींग टेक्नॉलॉजी, नागपूर चे सचिव वर्ष 1988 पासून |
| 4 | श्री. गांधी निशांत गिरीश | नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. छात्र जागृती, नागपूर चे सचिव वर्ष 12.9.2003 पासून |

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातर्फे त्यांना नामनिर्देशीत करावयाचे 1 सदस्याच्या ऐवजी 2 नामनिर्देशन पत्र 2 गटनेत्याकडून प्राप्त झाली आहेत त्यांचे नावे खालील प्रमाणे आहे.

| अनु क्र. | नाव | अर्हता |
|---|---|---|
| 1 | श्री. ठाकरे पांडुरंग विकास | 1) माजी नगरसेवक व माजी महापौर असल्याने पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव<br>2) नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. महालक्ष्मी सोशिओ फाऊंडेशनद्वारा संचालित अभ्यंकर नगर दुर्गा उत्सव मंडळ, नागपूर चे अध्यक्ष वर्ष 2005 पासून |
| 2 | श्री. जिचकार किशोर दामोदर | 1) माजी नगरसेवक असल्याने पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव<br>नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त |

| | | |
|---|---|---|
| | | संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. नागपूर प्रदेश एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष वर्ष 2012 पासून |

उक्त प्रमाणे प्राप्त 6 नामनिर्देशीत पत्राचा तपशील संलग्न पताका 'C' प्रमाणे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 मधील नियम 3 अन्वये 5 सदस्यांचे नामनिर्देशन पक्ष/गटाचे तौलनिक संख्याबळानुसार करणे बंधनकारक आहेत आणि हे नामनिर्देशन पक्षाचा गटनेत्या (मा. विभागीय आयुक्त यांची मान्यता प्राप्त) च्या शिफारसीसह सादर करण्याची संवैधानिक तरतूद आहे.

मा. विभागीय आयुक्त यांनी दिनांक 04.03.2017 रोजी पत्र क्र. एमयुएन–19(2)/सिआर–7(17)/2017 (संलग्न पताका 'क' वर) अन्वये श्री. संजय मधुकर महाकाळकर, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे पक्षनेता/गटनेते म्हणून केलेल्या निवडीस मान्यता प्रदान करीत असल्याचे आयुक्त, महानगरपालिकेला सूचित केले आहे. तसेच सदर पत्राला सहपत्रमध्ये नमूना 3 मधील नोंदणीनुसार 29 सदस्यांची यादी आणि भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष नागपूर महानगरपालिकेत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष एक स्वतंत्र गट असल्याची मान्यता प्रदान केलेली आहे.

दरम्यान श्रीमती हर्षला मनोज साबळे सदस्य, नागपूर महानगरपालिका यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे 17 सदस्यांचे स्वाक्षरी व ठरावासह पत्र दिनांक 16.05.2017 रोजी मा. विभागीय आयुक्त, नागपूर संभाग यांना सादर केले. (संलग्न पताका 'E' वर) व यात महानगरपालिकेत भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे 17 नगर सेवकाच्या संमतीने प्रभाग क्र. 27 (अ) चे नगरसेवक श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांची पक्षनेता/गटनेता पदावर सर्वानुमती निवड करण्याचे मा. विभागीय आयुक्तांना सुचित केले.

वरील पत्राच्या अनुषंगाने प्रादेशिक उपसंचालक, नगर परिषद प्रशासन विभागीय आयुक्त यांनी निगम सचिव, नागपूर महानगरपलिका यांना दिनांक 17.05.2017 रोजी दुपारी ठिक 4.00 वाजता श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांच्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष, नागपूर महानगरपालिका गटनेता/पक्षनेता पदासाठी 17 सदस्यांच्या स्वाक्षरीसह केलेला दावा पडताळूण पाहण्यासाठी व त्यांच्या स्वाक्षरीची शहानिशा करणे गरजेचे असल्यामूळे त्यांना दिनांक 17.05.2017 रोजी 4.00 वाजता बोलविण्याचे निर्देशीत केले व सदर कार्यवाहीच्या वेळी मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांच्या वतीने प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून प्रादेशिक उपसंचालय, नगर परीषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय हजर राहतील त्यांच्या समक्ष कार्यवाही पारपाडून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय आयुक्त यांना दिनांक 17.05.2017 रोजी निगम सचिव, महानगरपालिका यांनी पत्र क्र. 351/दिनांक 17.05.2017 अन्वये श्री. तानाजी सुकलाजी वनवे यांना लेखी पत्र देऊन न चुकता 17 सदस्यांसह डॉ. पंजाबराव देशमूख स्मृती सभागृह, महानगरपालिका सिव्हील लाईन नागपूर येथे उपस्थित राहण्याचे सुचीत केले. (संलग्न पताका 'F' वर)

वरील प्रमाणे 17 सदस्यांपैकी 16 सदस्यांची स्वाक्षरी पडताळणी घेण्यात आली यात श्री. रमेश गणपती पूणेकर, सदस्य भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्ष हे अनुपस्थित होते. या कार्यवाहीचा अहवाल निगम सचिव, महानगरपालिका यांनी विभागीय आयुक्त यांना सादर केला.

उक्त स्वाक्षरी शहानिशा वेळी अनुपस्थित असलेले सदस्याला पुनश्चः नोटीस काढून स्वाक्षरी शहानिशा करण्याचे मा. विभागीय आयुक्त यांनी सूचीत केल्याप्रमाणे श्री. रमेश गणपती पूणेकर यांना दिनांक 20.05.2017 रोजी सकाळी 11.00 वाजता निगम सचिव कार्यालयात उपस्थित राहण्याचे पत्र क्र. 352/दिनांक 18.05.2017 प्रेषित करण्यात आले आहे.

उक्त पत्राच्या अनुषंगाने सदस्य, महानगरपालिका श्री रमेश गणपती पुणेकर यांनी निगम सचिव, महानगरपालिका यांना लेखी पत्रान्वये सूचित केले कि ते दि. 19.5.2017 ते 26.5.2017 पर्यंत काही अपरिहार्य कारणामुळे बाहेरगावी असल्याने ते दि. 20.5.2017 रोजी स्वाक्षरी शहानिशा करीता उपस्थित राहू शकत नाही. (संलग्न पताका 'G' वर)

भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षा मार्फत श्री. संजय मधूकरराव महाकाळकर व श्री. तानाजी सुकलाजी वनवे दोन गटनेते असल्याचा दावा करीत असून त्यांनी दोन स्वतंत्र उमेदवारांचे नामनिर्देशन केले आहे. या

दोन गटनेत्यांपैकी नामनिर्देशीत कोणत्या उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र ग्राहय धरण्यात यावे व कोणाचे नामनिर्देशन पत्र अग्राहय धरण्यात यावे, याबाबत कायदेशीत वाद निर्माण झालेला आहे.

महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनहर्ता अधिनियम 1986 अन्वये महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनहर्ता नियम 1987 कलम 3 (1) (अ), कलम 4(2) व कलम 5(1) या अधिनियमातील वैधानिक तरतूदीचे पालन करून नियुक्ती झालेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचे महानगरपालिकेतील पक्षाचा गटनेता कोण आहे याबाबत निर्णय घेवून कळविण्याची विनंती मा. विभागीय आयुक्त, नागपूर संभाग पत्र क्र. 353/दिनांक 18.05.2017 अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. (संलग्न पताका 'H' वर)

मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग यांनी खालील प्रमाणे आदेश क्र. एमयुएन 19(2)/सिआर–7(17)/कावि–131/2017 दि. 19.5.2017 अन्वये पारित केले आहे. (संलग्न पताका 'I' वर)

1) या कार्यालयाच्या आदेश क्रमांक, एमयूएन–19(2)/सिआर–7(17)/2017 दिनांक 4.3.2017 याद्वारे श्री. संजय मधुकरराव महाकाळकर यांचे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, नागपूर शहर महानगरपालिका पक्ष/गट नेता म्हणून दिलेली मान्यता तात्काळ प्रभावे रद्द करण्यात येत आहे.

2) यापुढे श्री. तानाजी सुकलाजी वनवे, सदस्य भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस नागपूर शहर महानगरपालिका गटाचा पक्ष/गटनेता पदी झालेल्या निवडीस याद्वारे आज दि. 19.5.2017 रोजी मान्यता देण्यात येत आहे.

मा. विभागीय आयुक्त यांचे उक्त आदेश व महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशीत सदस्याची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 च्या तरतूदी अन्वये ज्येष्ठ विधिज्ञ ॲड कप्तान यांचे अभिमत मागविण्यात येत आहे. दरम्यान भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाचा गटनेतेचा वाद मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे दाखल झाला असल्याकारणाने भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षातर्फे नामनिर्देशीत करावयाच्या 1 सदस्य संदर्भात या प्रकरणात निर्णय झाल्यानंतर महानगरपालिकेला शिफारस करण्यात येईल.

करीता भारतीय जनता पक्षातर्फे त्यांच्या तौलनिक संख्याबळानुसार महानगरपालिकेला करावयाचा खालील प्रमाणे चार सदस्यांचे नामनिर्देशीत सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| अनु क्र. | नाव | अर्हता |
|---|---|---|
| 1 | श्री. अग्रवाल सुनील जीवराज | 1) माजी नगरसेवक व माजी उपमहापौर असल्याने पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव असलेले व्यक्ती<br>2) नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. महाराष्ट्र पावर लिफ्टींग असोशिएसन, नागपूर चे अध्यक्ष वर्ष 2008 पासून चे अध्यक्ष |
| 2 | श्री. पोकुलवार गणेश (मुन्ना) रामन्ना | माजी नगरसेवक व माजी उपमहापौर असल्याने पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव असलेले व्यक्ती |
| 3 | श्री. वानखेडे किशोर रामकृष्ण | नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. इन्स्टीटयुट ऑफ इंजीनिअरींग टेक्नॉलॉजी, नागपूर चे सचिव वर्ष 1988 पासून |
| 4 | श्री. गांधी निशांत गिरीश | नियमातील कलम 4 'छ' प्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम 1950 खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकिय संघटनेचा पदाधिकारी. छात्र जागृती, नागपूर चे सचिव वर्ष 12.9.2003 पासून |

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, सन्माननिय सचिवांनी या ठिकाणी मा.आयुक्तांचा जो बंद लखोटयातील अहवाल आहे त्याचे सविस्तर वाचन केले आणि तो जो घटनाक्रम भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाच्या संदर्भात वाचुन दाखविला आहे तो अत्यंत बरोबर आहे. मात्र मा.आयुक्तांनी शिफारस करत असतांना दोन पक्ष नेत्यांचा वाद असल्यामुळे भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाच्या नामनिर्देशित सदस्यांची शिफारस करता येणार नाही, अशा संदर्भातील उल्लेख त्यांच्या अहवालामध्ये केला आहे. मा.महापौरजी मी सभागृहाच्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो की ज्या वेळी हा वाद उपस्थित झाला त्यावेळी मा.उच्च न्यायालयामध्ये 22 तारखेला श्री.संजय महाकाळकर सन्माननिय सदस्य यांनी याचिका दाखल केली आणि त्या याचिकेची सुनवाई 26 तारखेला मा.उच्च न्यायालयाने केली आणि त्या 26 तारखेला एक इंटेरीम आदेश सुध्दा पारीत करण्यात आला. त्या आदेशामध्ये सन्माननिय सदस्य श्री संजय महाकाळकर यांनी या नेता निवडीला आव्हान देत असतांना श्री.तानाजी वनवे यांच्या निवडीला आव्हान दिले आणि स्टे करण्यासाठी त्यांनी विनंती केली. मा.महापौरजी, मा.उच्च न्यायालयानी दोन्ही बाजुचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर जो आदेश पारीत केला त्या आदेशामध्ये कुठल्याही प्रकारचा स्थगिती देण्यास मा.उच्च न्यायालयाने नकार दिलेला आहे आणि हा नकार देत असतांना जी कारणे नमुद करण्यात आली की गटनेता निवडीचा अधिकार तो त्या म्युनिसिपल पार्टीचा अधिकार आहे तो नगरसेवकांचा, त्यांच्या सदस्यांचा तो अधिकार आहे आणि त्या अधिकारामध्ये जे डेमोक्रेटीक प्रोसेस पुर्ण केली त्या प्रोसेसच्या माध्यमातुन श्री.तानाजी वनवे यांची भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाच्या गटनेते पदी निवड झालेली आहे. दुसरा महत्वाचा मुद्या मा.महापौरजी या ठिकाणी असा आहे की, मा.विभागीय आयुक्तांनी त्यांना मान्यता कधी दिली हा वादाचा प्रश्न या ठिकाणी मा.आयुक्त महानगरपालिका यांनी उपस्थित केला, मला असे वाटते की तो पुर्णतः चुकीचा आहे तो यासाठी चुकीचा आहे कारण त्या इंटेरीम आदेशामध्ये हे सुध्दा नमुद केले आहे की कुठल्याही गटाचा नेता बदलणारी ही प्रक्रीया पुर्णतः प्रशासनिक आहे तो ॲडमीनिस्ट्रेटीव्ह ॲक्टनुसार आहे त्यासाठी कुठल्याही विभागीय आयुक्तांची मान्यता त्या पक्षाच्या गटनेता निवडीसाठी अजिबात आवश्यक नाही. त्यामुळे या संपुर्ण अहवालमध्ये मा.आयुक्त महानगरपालिका यांनी या आदेशाचा जर उल्लेख केला असता तर मला वाटते की त्यांच्या मनामध्ये जी साशंकता आहे ती साशंकता पुर्णतः दुर झाली असती म्हणुन मा.महापौरजी, या संपुर्ण निवड प्रक्रीयेला कुठल्याही प्रकारचा स्थगनादेश नसल्यामुळे मा.विरोधी पक्ष नेता आणि भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षाचे गटनेते श्री.तानाजी वनवे यांनी जो उमेदवार या ठिकाणी नामनिर्देशन करण्याची सुचना केली आहे त्याचे नामनिर्देशन पत्र या ठिकाणी मा.आयुक्तांकडे 18 तारखेला दाखल केले त्यामध्ये श्री.किशोर जिचकार यांचे नामनिर्देशित पत्र आपण या 4 सदस्यांसोबत स्विकृत करावे ही विनंती मा.महापौरजी भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस पक्षांच्या सर्व सदस्यांच्या वतीने या ठिकाणी मी करतो मला असे वाटते की आपण त्या संदर्भातील इंटेरीम आदेश या ठिकाणी पारीत करावे.

श्री.संजय महाकाळकर :– मा.महापौरजी, 18 तारखेला नामनिर्देशन पत्र सादर करण्याची प्रक्रीया होती श्री.तानाजी वनवे यांच्या संदर्भात विभागीय आयुक्तांचा 19 तारखेला आदेश आलेला आहे. ही सर्व प्रक्रीया मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. जो पर्यत याचा पुर्ण रिझल्ट येत नाही तो पर्यत ही प्रक्रीया तशीच ठेवावी.

श्री.प्रफुल गुडधे :– मा.महापौरजी, या ठिकाणी मी माझे निवेदन केले की मा.उच्च न्यायालयामध्ये एखादी जर केस आहे आणि त्या संदर्भात इंटेरीम आदेश झालेला आहे आणि या इंटेरीम आदेशमध्ये असा कुठल्याही प्रकारचा स्थगनादेश महानगरपालिकेला या नामनिर्देशन सदस्यांच्या संदर्भात दिलेला नाही त्यांची नियुक्ती करण्याकरिता या सभागृहाची कुठलीही अडचण होणार नाही आणि भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसच्या

गटनेते पदी ज्या ठिकाणी तानाजी वनवे यांची नियुक्ती करण्यात आली आणि पुर्ण लोकशाही पध्दतीची प्रक्रीया पार पाडली आणि कुठल्याही प्रकारचा स्थगनादेश यामध्ये दिलेला नाही म्हणुन श्री.किशोर जिचकार यांची नियुक्ती भारतीय जनता पार्टीच्या 4 सदस्यांसोबत भारतीय कॉंग्रेस पक्षाच्या सदस्यांची निवड सोबतच करावी यामध्ये कुठलाही स्थगनादेश नाही आणि जर मा.उच्च न्यायालयाचे आदेश मी वाचुन दाखविले तर लक्षात येईल यामध्ये कुठलीही अडचण होणार नाही. सत्तापक्ष नेत्यांना विनंती आहे की या सभागृहाला मान्यता दयायची आहे सभागृह अडचणीत येणार नाही कुठलीही कायदेशीर बाब उद्‌भवणार नाही याची आम्ही पुर्णतः खबरदारी घेतो मा.महापौरजी म्हणुन आपण आमच्या विनंतीला मान देवुन ही प्रक्रीया पुर्ण करावी.

श्री.मनोज सांगोळे :— मा.महापौरजी, जे प्रकरण मा.उच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे अजुन पर्यंत त्यामध्ये न्याय निवाळा झालेला नाही जर आपण कुठले निर्णय घेवुन टाकु आणि तो चुकिचा ठरला तर येथे कोण जबाबदार राहणार आहे म्हणुन जेव्हा पर्यंत त्या निर्णयाची कॉपी आपल्याला येत नाही तो पर्यंत या सभागृहाला माझी विनंती आहे हा विषय स्थगित ठेवण्यात यावे.

श्री. तानाजी वनवे :— मा.महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल गुडधे यांनी या ठिकाणी सविस्तर टिपणी दिली आहे. माझे ऐवढेच म्हणणे आहे की, न्यायालयाच्या आदेशाचे अधिन राहुन आपण श्री.किशोर जिचकार यांचे नामांकन मंजुर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

श्री.संदीप जोशी :— मा.महापौरजी, या ठिकाणी प्रशासनाने आपले मत देखील या संपुर्ण प्रकरणामध्ये ठेवलेले आहे आणि त्या प्रकरणामध्ये त्याचा उल्लेख सन्माननिय सदस्य श्री.प्रफुल गुडधे यांनी केला. न्यायालयाचे 26 तारखेचे जे काही मत असेल माझी विनंती आहे मा.महापौरजी आपल्या मार्फेत सभागृहाचा अजेंडा ज्या दिवशी बंद झाला ती 24 तारीख होती आणि 24 तारखेला या पध्दतीचा कुठलाही डिसीजन झाला नव्हता आणि 24 तारखेला डिसीजन झाला नसल्यामुळे बंद लखोटा जो सभागृहाकडे पाठविण्यात आलेला आहे तो त्या पध्दतीने योग्य आहे कायदेशीर जो सल्ला या ठिकाणी विचारलेला आहे हे सभागृह देखील कुठे पळुन जाणार नाही आणि आपण देखील पळुन जाणार नाही, त्यामुळे कायदेशीर सल्लागाराचे मत या प्रकरणामध्ये आपण ताबडतोब घ्यावे आणि तो पर्यंत 4 जे सदस्य आहे त्यांना घोषीत करुन इतर मत जे प्रशासनाचे आहे त्याला मंजुरी दयावी.

श्री.प्रफुल गुडधे :— मा.महापौरजी, 24 तारखेला अजेंडा क्लोज झालेला होता आणि 26 तारखेला इंटेरीम आदेश आला यामध्ये जे कायदेशीर मत घ्यायचे आहे मला असे वाटते ते निश्चितपणाने घ्यावे फक्त हे करीत असतांना आपण 2 दिवसाचा कालावधी निश्चित करावा की 2 दिवसामध्ये महानगरपालिकेच्या कायदेविषयक सल्लागाराचे मत घेवुन आपण लगेच तिस—या दिवशी ही स्थगित सभा घेवुन नामनिर्देशन उमेदवारांची निवड करावी. कायदे विषयक सल्लागारांना 2 दिवसाचा कालावधी दयावा कारण विषय मोठा नाही जे 26 तारखेला डिसीजन झाले त्याचे इंटरपिटेशन महानगरपालिकेच्या कायदेविषयक सल्लागारांकडुन करुन घ्यायचे आहे आणि त्यांचे अभिमत जाणुन घ्यायचे आहे म्हणुन आपण 2 दिवसाचा अवधी देवुन तिस—या दिवशी महानगरपालिकेची हीच स्थगित सभा पुन्हा घ्यावी अशी विनंती मी मा.महापौरजी आपणांस करतो.

श्री.संजय महाकाळकरः— मा.महापौरजी, आता भाष्य केल्यापमाणे कायदेशीर सल्ला आहे आणि त्यामध्ये नमुद झाले आहे की जो पर्यत याचा अंतिम निर्णय मा.उच्च न्यायालयामध्ये लागत नाही तो पर्यत हा विषय स्थगित ठेवावा.

कार्यकारी महापौरः— मा.सदस्यगण मा.सत्तापक्ष नेता आणि प्रशासनानी ठेवलेल्या अहवालानुसार शिफारस केलेल्या भारतीय जनता पार्टीतर्फे खालील चार नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यास मान्यता प्रदान करण्यात येते या घोषणेस सभागृहाने मंजुर मंजुरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

1.श्री.अग्रवाल सुनिल जिवराज

2.श्री.पोकुलवार गणेश (मुन्ना) रामण्णा

3.श्री.वानखेडे किशोर रामकृष्ण

4. श्री.गांधी निशांत गिरीश

यानंतर राष्ट्रगित होवून सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित करण्यांत आली.

**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**कार्यकारी महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**हस्ता /— हरीश दुबे**
**निगम सचिव**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**

**हस्ता /— दिपराज पार्डीकर**
**कार्यकारी महापौर**
**नागपूर महानगरपालिका,नागपूर**